**ई फाईल**

नि.फौ. ख. क्र. २१२/२०२४

निशाणी क्र. ७

**कलम २२३ भा.ना. सु. संहिता प्रमाणे सत्यापन**

**सत्यप्रतिज्ञेवर कथन करते की,**

माझे नाव – स्वप्नाली संतोष भट

वय– ३८ वर्षे, व्यवसाय– महालक्ष्मी कलेक्शन

रा. – अजय अपार्टमेंट, सांगली मिरज रोड, सांगली.

माझा महालक्ष्मी कलेक्शन नावाने कापड विक्रीचा व्यवसाय आहे. आरोपी क. २ व ३ यांची व माझी सहा महिन्यांपुर्वी जुजबी ओळख झाली. ते प्लॉट करिता लक्ष्मी महिला नागरी सहकारी बँकेतुन कर्ज घेणार होते त्यासाठी त्यांनी माझी जामिनदार म्हणुन सही घेतली होती. त्यानंतर दोन ते अडीच महिन्यानंतर मला सीबील चा मॅसेज आला की, माझ्या नावे पंधरा लाखाचे कर्ज काढण्यात आले आहे. मी ही बाब समजल्यानंतर वकीलांचा कायदेशीर सल्ला घेतला. त्यांच्या सल्ल्याप्रमाणे मी बँकेत जावुन सदरच्या कर्ज प्रकरणाची कागदपत्रे पाहण्यास सांगितली. तो अर्ज मी प्रकरणात दाखल केला आहे. माझ्या असे लक्षात आले की, माझी व माझी पतीची सही जामिनदार म्हणुन घेतली मात्र आमच्या नावावर आमच्या नकळकत कर्ज प्रकरण करण्यात आले आहे. त्यामुळे आमची फसवणुक झाल्याचे आमच्या लक्षात आले आहे म्हणुन मी सांगली शहर पोलिस ठाण्यात तक्रार अर्ज दाखल केला. पोलिसांनी आमच्या तक्रारीला दाद दिली नाही. म्हणुन मी पुन्हा एकदा बँकेत जावुन माहिती अधिकाराखाली कागदपत्रे मिळण्याकरिता अर्ज दाखल केला. त्यानंतर आम्हाला पोलिस ठाण्यातुन पडताळणी करुन कागदपत्रे मिळाली. पोलिसांनी सदर बँकेच्या मॅनेजर व क्लार्कचा जबाब घेतला असता असे माहिती झाली की, बँकने चौदा लाख सहा हजार आठशे साठ ही रक्कम आरोपी क्र. २ व ३ यांना रोख स्वरुपात दिलेली आहे. त्यानंतर आठ दिवसांनी आरोपींना तीस हजार मात्र रोख दिलेले आहेत अशी खात्यामध्ये नोंद दिसत आहे. आरोपी क्र. २ च्या नावाने आरोपी क्र. २ व ३ यांनी हमी पत्र दिलेली आहेत. त्यामध्ये असे नमुद आहे की, कर्जाची जबाबदारी जामिनदार

क्र. २ व ३ यांच्या पतीची राहिल आणि कर्जदार म्हणुन आरोपी क्र. २ व ३ यांच्या सहया आहेत. सदर कर्ज खात्यावर आरोपी क्र. २ व ३ यांची मुलगी साक्षी परांजपे हिने रुपये पंधरा हजार जमा केल्याची नोंद दिसुन येते. यावरुनच ते कर्ज खाते माझ्या नावचे नाही हे दिसुन येते. मी पोलिसांकडे एन सी दाखल केली आहे. मात्र आजतागायत त्यावर कोणतीही कारवाई झाल्याचे दिसुन येत नाही. सबब, मी न्यायालयात प्रस्तुतची फिर्याद दाखल केली आहे.

आरोपींनी मी कोणत्याही प्रकारचे कर्ज घेतले नसतानाही आणि केवळ जामिनदार राहिले असताना माझ्या नावावर पंधरा लाखाचे कर्ज दाखवले आहे व माझी फसवणुक केली आहे. मी कोणताही कर्ज मागणी अर्ज केलेला नव्हता. माझा व सदर बॅंकेचा कोणताही संबंध नाही. तसेच माझे त्या बॅंकेत कोणत्याही प्रकारचे खाते नाही. मी याबाबत चौकशी केली असता आरोपी बॅंकेने वेळकाढुपणा करणे, उडवाउडवीची उत्तरे देणे असे केले आहे. मी सर्व कागदपत्रे पोलिस ठाण्यात महितीच्या अधिकारा खाली अर्ज करुन प्राप्त केले आहेत. बॅंकेने मला कोणत्याही प्रकारची कागदपत्रे दिलेली नाही. पोलिस ठाण्यामध्ये याबाबत माझा जबाब दिनांक १५/०९/२०२३ रोजी नोंदविलेला आहे.

Swapnali
--------

फिर्यादीची सही

**श्रवणोत्तर जबानी स्वीकृत**

Wedwah 17/09/2025

**(व्ही.ए ओदय)**

**दिनांक – १७.०९.२०२५.** **३ रे सह न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, सांगली.**